**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/५३/२०२३

दिनांक-२४.०२.२०२५

**प्रति,**

१. तम्मा मलाप्पा कोळी-अथणी

२. शारदा वसंत कोळी

३. दिपक वसंत कोळी

४. विमल इराप्पा कोळी

५. राजेंद्र वसंत कोळी

६. संजय वसंत कोळी

सर्व रा. जत,ता.जत जि.सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. रमेश आण्णाप्पा अथणी-कोळी

२. कु.गायत्री रमेश अथणी-कोळी

दोघे रा.सी/ओ सौ.सुनंदा रमेश अथणी-कोळी

मु.पो. येळदरी ता.जत जि.सांगली ----- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**वाद मिळकतीचा तपशिल**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाचा फेरफार |
|---|---|---|---|---|---|
| जत | जत | ३८३/१ | ०२ हे.९० आर.<br>पो.ख ० हे.०२ आर. | संपूर्ण | २०१७३ |

**निकालपत्र**

मौजे जत, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ३८३/१ या वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी जत यांनी फेरफार क्र.२०१७३ मंजूर करणेचा आदेश पारीत केलेला होता. सदर आदेशावर व्यथित होऊन प्रस्तूत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी आपले अपील अर्जामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकतीचे फे.नं.२०१७३ चे नोंदीवर नाराज होवून प्रस्तुतचे अपिल अपेलंटला मे. कोर्टात दाखल करणे भाग पडत आहे. अपेलंटचे भाऊ कै. भिमू मलाप्पा कोळी (अथणी) हे दि. ०७/१२/१९९४ रोजी मयत झाले असून त्यांना अपेलंट हे सरळ व कायदेशिर वारस असलेबाबत दि. १०/०९/२०१५ रोजीचे प्रतिज्ञापत्र अपेलंटने खालील कोर्टाकडे सादर केले असता जाबदार यांनी खालील कोर्टाची दिशाभूल करुन अपेलंट नं. १ चे नावाचा गैरवापर करुन खोटा व लबाडीचा मजकूर नमुद करुन व खोटी सही करुन नमुद तक्रारीचे कामकाज चालविले असता सर्व अपेलंटनी संयुक्तीक पूरशीसीव्दारे दि. २६/११/२०१५ रोजी म्हणणे सादर केलेले होते व आहे.

२. वास्तविक प्रथमदर्शनी पाहता फेरफार नं. १९४३४ चे चौकशीकामी जाबदार हे एकटेच वारस असून अन्य कोणीही वारस नाहीत. याबाबतचे प्रतिज्ञापत्र देखिल खालील कोर्टाकडे सादर केलेले असून सदरचे कृत हे शासनाचे फसवणूकी बाबतचे असून फौजदारी दाखल करणेस पात्र देखील आहे असू असून नमुद तर नं. २६४/२०१५ चे कामी झाले निकालाव्दारे अपेलंट यांना समजून आले की, फेरफार नं. १९४३४ चे नोंदी अधारे जाबदारचे नावाचे नोंद रेकॉर्ड सदरी झालेले आहे. परंतु सदरची वस्तूस्थिती मा. मंडळ जत यांचे झाले निणर्यावरुन अपेलंटला कळून

आल्याने सदर निर्णयावर नाराज होवून प्रस्तुतचे अपिल अपेलंटने दाखल केले असून त्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येत नाही.

३. खालील मे.कोर्टाला जाबदारचे नावाची नोंद रद्द करणेचे अधिकार नसल्याने व सदरची वर नमुद वस्तुस्थिती खालील मे. कोर्टाला मान्य असूनही फेरफार नं. १९४३४ ची नोंद रद्द ठरविले खेरीज फेरफार नं. १९८१७ ची नोंद मंजूर करता येणार नसलेने देखील प्रस्तुतचे अपिल अपेलंटने दाखल केलेले होते सदर केस कामी कोर्टाने क्र.आर.टी.एस अपील नं. ८१/२०१६ निकाल दि. ०७/०१/२०१७ रोजीच्या आदेशप्रमाणे फे.नं. १९४३४ व फे.नं. १९८१७ रदद करून फेर वारसा करणे संदर्भात सुचना केलेल्या होत्या व आहेत.

४. सदर वर नमूद अपील प्रलंबित असताना जाबदार नं. १ यांनी अपेलंट यांना असणाऱ्या हक्क व अधिकारा पासून वंचित रहावे यासाठी अपेलंट यांचे हक्कावर बंधनकारक राहणार नसलेला तथाकथित दस्त करून सदर मिळकत जाबदार नं. २ यांना तबदिली केलेली होती परंतु मुळात लिहून देणार म्हणून जाबदार नं. १ यांचेच नावाची असणारी नोंद या मे. कोर्टाने फे.नं. १९४३४ रदद केला असल्याने सदर आदेशाप्रमाणे जाबदार नं. २ यांना कोणताही प्रथम दर्शनी हक्क व अधिकारी प्राप्त होत नाही. त्यामुळे सदर दस्त सक्षम दिवाणी न्यायालयाकडून कायदेशिर असल्याचे जाहीर झाल्या खेरीज सदरच्या दस्ताची फे.नं. २०१७३ ने नोंद धरणे क्रम प्राप्त नसून तसे कायदयाने करता देखील येणार नाही.

५. खालील कोर्टाने अपेलंट यांना कोणतेही पूर्व नोटीस न देता त्याशिवाय त्यांचे म्हणणे न घेता सदरचा आदेश केलेला असल्याने तो चुकीचा आहे. खालील मे कोर्टाने तथाकथित दस्त सक्षम न्यायालयाकडून कायदेशिर असल्याचे जाहीर केल्या खेरीज सदरची नोंद घेता येणार नव्हती परंतु सदरची नोंद बेकायदशिर रित्या रेकॉर्ड दफतरी घेतली असून ती चुकीची आहे.

६. खालील मे कोर्टाने सदरच्या बाबीचे व वर नमूद कागदपत्रांचे कोणतेही अवलोकन न करता व सदरचा दस्त प्रथम दर्शनी करताना जाबदार नं. १ यांना कोणताही हक्क व अधिकार नसताना केलेला असल्याने सदरचा दस्त प्रथम दर्शनी नोंदवता येणार नसल्याने सदरचा दस्त बेकायदशिररित्या नोंदला गेला असून तो चुकीचा आहे.

**जाबदार यांना प्रस्तुत अपिलकामी नोटीस बजाऊन म्हणणे मांडणेची संधी देऊनही प्रकरणी कोणतेही म्हणणे सादर केलेले नाही.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील कामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे याचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे जत, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ३८३/1 या वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी जत यांनी फेरफार क्र. २०१७३ मंजूर करणेचा आदेश पारीत केलेला होता. सदर आदेशावर व्यथित होऊन प्रस्तूत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे. प्रकरणी अपिलार्थी यांनी विलंब माफी अर्ज दाखल केलेला आहे. या कार्यालयाकडील आदेश क्र.आरटीएस/अपील/५३/२०२३, दिनांक १०.०७.२०२४ ने विलंब माफ करणेत आलेला आहे.

२. वादातीत फेरफार क्रमांक २०१७३ पाहता, जाबदार १ यांनी जाबदार २ यांना वाद मिळकत बक्षिसपत्राचा दस्त क्र.३८३९/२०१६ ने बक्षिसपत्राने दिलेली आहे. मुळात जाबदार १ यांचे नांव वाद मिळकतीच्या अधिकार अभिलेख सदरी ज्या वारसा फेरफाराने आले आहे तो वारसा फेरफार क्रमांक १९४३४ हा तत्कालीन उपविभागीय अधिकारी जत यांचेकडील क्र.आरटीएस/अपील/८१/२०१६ दिनांक ०७.०१.२०१७ रोजीचे आदेशाने रद्द केलेली आहे. सदर आदेश कोणत्याही न्यायालयाने रद्द बातल

केल्याचे जाबदारांनी या न्यायालयाचे निदर्शनास आणलेले नाही, यावरून सदर आदेश कायम असलेचे सिध्द होते.

३. वाद मिळकतीचे बक्षिसपत्र करून देणार जाबदार ०१ यांना वाद मिळकतीचा मालकी हक्क ज्या फेरफाराने प्राप्त झालेला होता. तो वारस फेरफारच रद्दबातल झालेने जाबदार क्र.०१ यांनी जाबदार ०२ यांना करून दिलेले बक्षिसपत्र कायदेशीरदृष्टया निरर्थक ठरते. तसेच वाद मिळकतीचा मुळ फेरफार क्र.१९४३४ रद्द झालेमुळे तदनंतर झालेले सर्व फेरफार रद्द होणेस पात्र ठरतात. या कायदेशीर बाबींचा विचार करता फेरफार नंबर २०१७३, ची नोंद रद्द करणे आवश्यक आहे. सबब मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**निकालपत्रातील नमुद कारणास्तव अपिलार्थी यांचा अपील अर्ज मान्य येत आहे. तसेच मौजे जत ता.जत येथील फेरफार क्र.२०१७३ ची नोंद रद्द करणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

सदर आदेशाचा अंमल अपिल कालावधिनंतर करणेत यावा.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

ठिकाण - जत

दिनांक -२४.०२.२०२५

( अजयकुमार नष्टे )

**उपविभागीय अधिकारी**

**जत उपविभाग जत**

प्रत - तहसिलदार, जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरीता रवाना.